महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २१६ वा | दिनांक : २२/०६/२०२५ | वार : रविवार

## बच्चन यांच्या आवाजाने मीही त्रस्त - सिंधिया



**इदौर :** इंदूरमध्ये माजी आमदार सुदर्शन गुप्ता यांनी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेतली. त्यांनी मंत्र्यांना सांगितले की, जेव्हा ते आपत्कालीन परिस्थितीत फोन करतात तेव्हा त्यांना अमिताभ बच्चन यांचा आवाज ऐकू येतो. विशेषतः वृद्ध, रुग्ण आणि व्यापारी वर्गातील लोकांना यामुळे अडचणी येत आहेत. त्यानंतर मंत्री सिंधिया यांनी त्यांना असेही सांगितले की हो, हे खरे आहे, मलाही याचा त्रास होतो.

खरंतर, केंद्र सरकार सायबर फसवणूक आणि डिजिटल फसवणुकीविरुद्ध जनजागृती मोहीम राबवत आहे. याअंतर्गत, मोबाईल कॉलच्या सुरुवातीला एक विशेष कॉलर ट्यून प्रसारित केली जात आहे. याचा उद्देश वापरकर्त्यांना ओटीपी, बँक तपशील किंवा इतर वैयक्तिक माहिती शेअर न करण्याची चेतावणी देणे आहे.

माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते सुदर्शन गुप्ता यांनी केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना निवेदन सादर केले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, कॉलर ट्यून वाजत असल्याने मोबाईल कॉल करण्यात वारंवार व्यत्यय येत आहे. यामुळे कॉल डायलिंगमध्ये विलंब होत आहे, कॉल ड्रॉप होत आहे आणि कनेक्टिव्हिटी समस्या येत आहेत. बऱ्याच वेळा आपत्कालीन परिस्थितीत लोक बोलू शकत नाहीत.

माजी आमदार म्हणाले की, डिजिटल अटक सारख्या मोहिमा आवश्यक आहेत, परंतु मोबाईल कॉल दरम्यान वाजणाऱ्या कॉलर ट्यूनऐवजी, एसएमएस, सोशल मीडिया, टीव्ही-रेडिओ किंवा इतर प्रचार माध्यमांसारख्या इतर पर्यायी माध्यमांद्वारे ही जागरूकता वाढवली पाहिजे, जेणेकरून जागरूकता आणि सुविधा दोन्हीचा समतोल राखला जाईल.

सिंधिया म्हणाले की, तुमची मागणी रास्त आहे. तातडीचे कॉल करण्यात खूप अडचण येते. अनेक ग्राहकांनी यापूर्वीही तक्रार केली आहे. मी यावर त्वरित कारवाई करेन. सिंधिया पुढे म्हणाले की, आम्ही तांत्रिक उपाय शोधण्यासाठी काम करत आहोत. विभागीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या जातील.

गुप्ता यांचे निवेदन वाचल्यानंतर मंत्री सिंधिया यांना त्यावर स्वाक्षरी करायची होती. ते पत्राखाली ठेवण्यासाठी आधार शोधू लागले. त्यांनी माजी आमदाराला मागे वळण्यास सांगितले. मग त्यांनी ते पत्र गुप्ता यांच्या पाठीवर ठेवले आणि त्यावर स्वाक्षरी केली आणि पत्र कारवाईसाठी त्यांच्या अधिकाऱ्यांना दिले. ही घटना पाहून तिथे उपस्थित असलेले सर्वजण जोरजोरात हसायला लागले.

शनिवारी जागतिक योग दिनानिमित्त इंदूरमध्ये आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आलेले केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया म्हणाले की, इंदूर योगाच्या क्षेत्रातही इतिहास घडवत आहे. योगाचे महत्त्व स्पष्ट करताना सिंधिया यांनी सर्वांना झाड लावण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, झाडे ऑक्सिजन देतात. मानवी जीवनासाठी ऑक्सिजन खूप महत्त्वाचा आहे. कार्यक्रमात मोठ्या संख्येने तरुण, महिला आणि वृद्ध योगा करण्यासाठी आले होते.

## संजय राऊतांनाही गुवाहाटीला यायचे होते : काय झाडी, काय डोंगर फेम' शहाजी पाटलांचा दावा



**सोलापूर :** खासदार संजय राऊत यांनाही आमच्यासोबत गुवाहाटीला यायचे होते. पण आमदारांच्या विरोधामुळे त्यांना ते जमले नाही, असा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

२०२२ मध्ये शिवसेनेत झालेली बंडखोरी हा महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरला. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या ४० आमदारांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विरोधात बंड पुकारले. त्यामुळे महाविकास आघाडीचे ठाकरे सरकार कोसळले. या घटनाक्रमामुळे शिवसेना दोन गटांत विभागली गेली. शिंदेंनी मूळ शिवसेना हस्तगत करून भाजपच्या मदतीने युती सरकार स्थापन केले, तर उद्धव ठाकरे यांनी 'शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' म्हणून पुढे वाटचाल सुरू केली. या घटनेला ३ वर्षे लोटल्यानंतर शहाजी बापू पाटील यांनी उपरोक्त दावा केला आहे.

शहाजी बापू पाटील पंढरपूरमध्ये बोलताना म्हणाले की, संजय राऊत यांनाही आमच्यासोबत गुवाहाटीला यायचे होते. पण त्यावेळी ३० ते ३५ आमदारांचा त्यांना विरोध होता. त्यांना येता आले नाही. यामुळेच राऊत आजही चिडचिड करून एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करतात. सद्यस्थितीत ठाकरे गटातील अनेक आमदारांना एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व मान्य आहे. त्यामुळे लवकरच राज्यात राजकीय घडामोडी घडतील.

गत काही दिवसांपासून राज्यात ठाकरे गट व मनसेच्या युतीची चर्चा सुरू झाली आहे. शहाजी बापू पाटील यांनी यावेळी या संभाव्य युतीवरही भाष्य केले. सध्या ठाकरे गट व मनसेच्या युतीचा विषय पुढे येत आहे. पण मनसेने काँग्रेससोबत गेलेल्या उद्धव ठाकरेंशी युती केली, तर राज ठाकरे यांनी हिंदुत्व सोडले असे म्हणावे लागेल, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी मुंबई महापालिकेत महायुतीचीच सत्ता येणार असल्याचाही दावा केला.

उल्लेखनीय बाब म्हणजे शहाजी बापू पाटील हे सांगोल्याचे शिवसेनेचे माजी आमदार आहेत. २०२२ मध्ये 'काय झाडी, काय डोंगार, काय हाटील... एकदम ओके मधी हाय' या गावरान शैलीतील डायलॉगमुळे त्यांना सोशल मीडियावर रातोरात प्रसिद्धी मिळाली. शिवसेनेतील बंडखोरीवेळी ते एकनाथ शिंदेंसोबत गुवाहाटीला गेले होते. त्यावेळी त्यांनी आपल्या कार्यकर्त्यासोबत फोनवर साधलेल्या संवादाची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. या क्लिपमधील माणदेशी बोली व त्यांच्या रांगड्या शैलीतील भाष्य चांगलेच व्हायरल झाले होते.

## बीडमध्ये पैशांसाठी पुन्हा अपहरण करत मारहाणीचा प्रकार

**बीड :**बीडमध्ये सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण आणि हत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र संतापले होते. त्यानंतर आरोपी वाल्मीक कराडसह इतर आरोपींना अटक करत मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. असे असले तरी देखील बीडमधील गुन्हेगारी कमी होण्याचे नाव घेताना दिसत नाहीये. पैशांसाठी जीवे मारण्याच्या धमक्या तसेच अपहरणाच्या घटना सुरूच असल्याचे दिसत आहे. धारूर येथे उसने पैसे वसूल करण्यासाठी चार तरुणांनी एका तरुणाचे अपहरण केल्याचे समोर आले आहे. तसेच मुलाच्या घरी फोन करत मुलगा जीवंत पाहिजे असल्यास ५० हजार पाठवा, अशी धमकीही देण्यात अली आहे.

बीड जिल्ह्यातील धारूरमध्ये उसने पैसे वसूल करण्यासाठी चौघांनी मिळून एका तरुणांचे अपहरण केले आहे. मुलाच्या घरी फोन करून मुलगा जीवंत हवा असेल तर आताच्या आत्ता ५० हजार रुपये टाका अन्यथा मुलगा तुम्हाला परत दिसणार नाही, अशी धमकी दिली आहे. हा प्रकार समोर येताच जिल्ह्यात पुन्हा खळबळ उडाली. धारूर पोलिसांनी या प्रकरणी तातडीने तपास करत दोघांना अटक केली आहे.

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. केवळ १० हजार रुपयांच्या उसने व्यवहारावरून तब्बल ८० हजार रुपयांची वसुली करत एका तरुणाचे अपहरण करण्यात आले. ही घटना गुरुवारी सायंकाळी घडली असून, अपहरण झालेल्या तरुणाचे नाव कृष्णा मैंद आहे. काही महिन्यांपूर्वी कृष्णाने धनराज चाटे, पृथ्वीराज राग आणि परमेश्वर आगाव यांच्याकडून १० हजार रुपये उसने घेतले होते. मात्र, आरोपींनी दररोज १ हजार रुपयांचे व्याज आकारल्याने ही रक्कम ८० हजार रुपयांपर्यंत गेली.

पैसे वसूल करण्याच्या उद्देशाने आरोपींनी कृष्णाचे अपहरण केले आणि त्यानंतर त्याच्या आईला फोन करून धमकी दिली, मुलगा जिवंत पाहिजे असेल, तर ५० हजार रुपये पाठवा, अन्यथा तो कधीच दिसणार नाही. या धमकीमुळे घाबरलेल्या आईने तात्काळ पोलिसांशी संपर्क साधला. पोलिसांनी तातडीने या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत कारवाई करण्यास सुरुवात केली.

धारूर पोलिसांनी तपास करत अंबाजोगाई जवळील साकुर येथून दोघांना अटक केली, तर दोघे अद्याप फरार आहेत. अपहरण झालेल्या कृष्णा मैंद याची सुटका करत अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिस कसून चौकशी करत आहेत. आरोपींनी कृष्णाला १० हजार दिले होते त्याला दररोज एक हजार रुपये व्याज लावला होता. त्याचे एकूण ८० हजार रुपये झाल्याने कृष्णाचे अपहरण करत त्याला मारहाण केल्याचे समोर आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५


## सुशीलादेवी देशमुख विद्यालयात 'योग दिन' साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्सहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी. जे. पहिलवान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष श्री. निखिल माने यांच्या उपस्थितीत हा योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी योग प्रशिक्षक श्री. संतोष राजपूत यांनी विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारचे योगासने आणि प्राणायाम करून घेत आपल्या जीवनात योगाचे महत्त्व कसे आहे हे पटवून दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. रमाकांत छडीदार यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात जागतिक योग दिवस उत्साहात साजरा










**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा येथे जागतिक योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक यांनी सक्रिय सहभाग घेतला. सदर कार्यक्रमासाठी योगशिक्षिका श्रीमती राऊत मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. राऊत मॅडम यांनी सुरुवातीला विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले तसेच विद्यार्थ्यांकडून योग पूर्वक करावयाच्या हालचाली जसे की पायाच्या हालचाली, कमरेच्या हालचाली,मानेचा व्यायाम , हाताच्या हालचाली इत्यादी व्यायाम करून घेतला. यानंतर कपालभारती, भ्रमरी, ताडासन, मंडूकासन, वृक्षासन, मयुरासन, भुजंगासन, त्रिकोणासन, वज्रासन, अर्धचक्रासन, अर्ध उष्ट्रासन , शवासन इत्यादी आसनाची प्रात्यक्षिके योग्य पद्धतीने विद्यार्थ्यांकडून करवून घेण्यात आली. विद्यार्थ्यांबरोबर सर्व शिक्षक व शिक्षिका यांनी सुद्धा विद्यार्थ्यांबरोबर योगाच्या प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला. शाळेचे मुख्याध्यापक श्री पी शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सौ मालोदे मॅडम, सौ शिंदे मॅडम, सौ भारद्वाज मॅडम, सौ भिंगोले मॅडम, श्री वाघ सर ,श्री चव्हाण सर ,श्री पठाण सर ,श्री सूर्यवंशी सर , खापे मामा यांच्या सहकार्यातून जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात पार पाडण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना योग शिक्षणाचे महत्त्व पटले व यापुढे रोज योगा न चुकता करणार अशी शपथ घेतली.

# ओलंपिक दिनानिमित्त



ऑलम्पिक आणि भारत लेखक- प्रवीन शिंदे क्रीडा संघटक व तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य कन्नड ,मला लहानपणापासून खेळांची आवड आहे आणि गेली साठ वर्षे मी क्रीडा क्षेत्राशी खूप जवळून संबंधित आहे. खेळाडू, संघटक, आयोजक, प्रायोजक, प्रशिक्षक, व्यवस्थापक, क्रीडा मानस शास्त्रज्ञ अशा कितीतरी भूमिकांतून मी हे क्षेत्र अनुभवले आहे. दर चार वर्षांनी ऑलिम्पिक स्पर्धा कोठे ना कोठे होतात आणि आता टी व्ही मुळे सगळे खेळ त्यांच्या सर्वोत्तम अविष्कारात पाहायला मिळतात. अर्थात एका दु:खाची बोच सतत असते. अगदी छोटे छोटे देशसुद्धा पदके मिरवतात, त्यांची राष्ट्रगीते पदक समारंभात वाजवली जातात. त्यात भारत आणि भारतीय खेळाडू कोठेच नसतात. दरवेळेला आपले खेळाडूच सर्वांच्या शिव्या खातात. यावेळी तर अशी हवा निर्माण केली गेली होती की आपल्याला दहाबारा पदके तर सहज मिळतील. त्यातली किती सुवर्ण पदके असतील ते पहायचे. पण प्रत्यक्षात पहिले संपूर्ण १२ दिवस आपली पदक तालिका रिकामीच राहिली. हे असे वारंवार का होते हे सर्वसामान्यांना समजणे अवघड आहे. आणि ज्यांनी निर्णय घ्यायचे आहेत ते हितसंबंध जपण्यात गुंतलेले असतात. त्यामुळे जोवर ऑलिम्पिक स्पर्धा होत राहतील तोवर आपली नालायकी सबंध जगासमोर याच पद्धतिने येत राहील.क्रीडा क्षेत्र हे युवकांचे क्षेत्र आहे. प्राधान्याने वयाच्या २४ वर्षापर्यंतच खेळाडूला आपल्या कामगिरीचे शिखर गाठायचे असते. मग त्याला त्या क्षेत्रात यश आणि करिअर मिळाले तर आणखी १०/१२ वर्षे तो खेळत राहतो. वयाची सर्वात महत्वाची वर्षे क्रीडा क्षेत्रात घालवायची असली तर कुटुंब आणि समाज त्याच्यामागे भक्कम उभा असला पाहिजे. कारण कितीही श्रीमंत घरातले असले तरी युवक पैशाच्या बाबतीत परावलंबी असतात. ते क्रीडांगणे आणि खेळांना लागणारे साहित्य आणि सोयीसुविधा निर्माण करू शकत नाहीत. ती जबाबदारी समाजाची आणि शासनाची आहे. आपण भारतीय तर अत्यंत पोटार्थी लोक आहोत. अतिशय सुस्थितीत असलेली कुटुंबे सुद्धा मुलगा किंवा मुलगी नवव्या वर्गात गेल्याबरोबर त्यांचे खेळ आणि इतर सर्व छंद पूर्णपणे थांबवून टाकतात. १२वी नंतर मेडिकल किंवा इन्जिनिअरिन्गाला प्रवेश मिळाला की खेळ वगैरेचा प्रश्नच येत नाही. याचे कारण खेळ आणि खेळाडूला करिअर नाही हेच आहे. आज क्रिकेटच्या खेळात भरपूर पैसा आल्याने आईवडील चांगल्या खेळाडूना थोडीफार सूट देतात खरे, पण खेळाबरोबरच त्यांनी अभ्यासातसुद्धा पहिला नंबर मिळवावा अशी पालकांची अपेक्षा असते. आज युरोप आणि अमेरिकेत खेळाच्या प्रशिक्षकांची सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये गणना होते. तसे आपल्याकडे होण्याची सुतराम शक्यता नाही. कारण प्रशिक्षकांचे महत्वच आपल्याला कळत नाही. मुळात खेळ ही व्यक्तिमत्व घडवण्याची सर्वात महत्वाची बाब आहे हेही आपल्याला समजत नाही. आपले शासन तर ग्रेटच आहे. ते शारीरिक शिक्षकांनाच क्रीडा प्रशिक्षक समजतात. प्रशिक्षक घडवण्याची काळजीच घेतली गेली नसल्याने चांगल्या दर्जाचे खेळाडू घडवणे आपल्याला अशक्य आहे.आपले भारताचे धोरण म्हणजे क्रीडाक्षेत्राकडे होईल तितके दुर्लक्ष करायचे. मग ऑलिम्पिक जवळ आले की आपण काहीतरी करतो आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न होतो. तोही अत्यंत चुकीच्या दिशेने होत असल्याने पदके मिळतच नाहीत. जे खेळाडू आपले आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर यशस्वी झालेले असतील त्यांना पैशाची मदत द्यायची, परदेशात प्रशिक्षणासाठी पाठवायचे. नाहीतर परदेशी प्रशिक्षक भरपूर पैसा मोजून भारतात आणायचे आणि मिळालीच काही पदके तर आभाळाला हात लागल्याचे समाधान मानायचे. अशाने गेल्या ७० वर्षात आपण आपल्या क्रीडा क्षेत्राचे प्रचंड नुकसान केलेले आहे. हे म्हणजे फुलांना आणि फळांना पाणी व खत घालून उत्तम बागायत करण्याची अपेक्षा बाळगण्यासारखे आहे. प्रकाश पडुकोण आणि गोपीचंद सारखे जे भारतीय प्रशिक्षक इतर सर्व गोष्टींचा त्याग करून आपल्या खेळाच्या मागे उभे राहिले त्यांनी हे सिद्ध करून दाखवले आहे की आपले प्रशिक्षक जगातल्या सर्वोत्तम प्रशिक्षकांच्या तोडीचे ठरू शकतात. परदेशी प्रशिक्षक नेमणे ताबडतोब बंद व्हायला हवे. आणि प्राधान्याने आपले प्रशिक्षक आणि खेळाडू घडवण्याच्या प्रयत्नाला लागावे. चीनने सुद्धा क्रीडा क्षेत्रात उतरायचे ठरवले तेव्हा रशिअन आणि इतर युरोपिअन प्रशिक्षक २ वर्षांकरता बोलावले होते. पण त्यांच्याकडून त्यांनी चीनमधील प्रशिक्षक घडवले आणि मग त्यांनाचआपले खेळाडू घडवण्याची जबाबदारी दिली. त्यांनी सुद्धा आपापल्या पद्धतीने क्रीडा क्षेत्रात संशोधन केले व भरपूर मेहनत घेतली. आज चीन अमेरिकेला टक्कर द्यायची क्षमता बाळगून आहे. आपल्याकडे येणाऱ्या परदेशी प्रशिक्षकांना भाषेच्या अडचणीमुळे खेळाडूंशी संवादच साधता येत नाही. मग ते प्रशिक्षण काय देणारआता प्रशिक्षकांची जर ही अवस्था तर क्रीडा मानस शास्त्र, क्रीडा वैद्यक, क्रीडा व्यवस्थापन, संयोजन आणि आयोजन, क्रीडांगणांची देखभाल,

**कृष्णा शिंदे - कन्नड**


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात योग दिन उत्साहात संपन्न






**जालना :** बदलत्या जीवनशैलीमूळे मानवी जीवनचक्र बिघडले आहे. त्यासाठी दररोज थोडातरी वेळ आपल्या स्वतःच्या आयुष्यासाठी काढणे आवश्यक आहे. नियमित योग केल्यामुळे मानवी जीवन तणाव विरहित राहते. वर्तमान काळात विविध प्रश्नांनी मानवी जीवन त्रस्त झाले आहे. मानवी जीवन आनंद ठेवायचे असेल तर योग साधना महत्त्वाची आहे असे प्रतिपादन योगशिक्षक प्रा.डॉ.भिकुलाल सले यांनी केले.बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी त्यांनी विविध प्रकारचे आसने व योग क्रिया यांचे प्रात्यक्षिक करून घेतले.प्रा. सुरेश कागणे यांनीही यावेळी विविध योग क्रिया केल्या. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना यांच्याद्वारे करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. उद्धव थोरवे, डॉ. कुणाल देशपांडे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल च्या वतीने ११६ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, २२ जून २०२५ ला दुपारी २:३० वाजता, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल चे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर (पेठे नगर), भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर येथे "मला कर्तृत्ववान माणसे पाहिजेत, त्यांच्या कर्तृत्वाबद्दल माझी खात्री झाली पाहिजे." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त ११६ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला उद्घाटन मार्गदर्शन जिल्हा व सत्र न्यायालयाचे एडव्होकेट विजय सुरडकर तर मुव्हमेंट-२१, चे प्रचारक देवाजी पाटील, नागपूर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेला उपस्थित सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते समजून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहिले पाहिजे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल च्या वतीने कळविण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय योग दिन शनिवारी (ता. २१) रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी सहा वाजता उमरगा येथील योगगूरू देवराज गरड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानसत्रांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री तथा भाजप नेते बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांनी योग व प्राणायाम करून विशेष सहभाग नोंदवला. प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, उपमुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, रोटरी क्लब मुरूम सिटी चे अध्यक्ष कमलाकर मोटे, रशिद शेख, गोविंद पाटील, श्रीकांत बेंडकाळे, सुरेश शेळके, साई टाचले, गणेश अंबर, सुधीर चव्हाण, सुजित शेळके, अनुराधा जोशी, सच्चिदानंद अंबर, डॉ. प्रतापसिंग राजपूत, प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले, डॉ. राजेंद्र गणापुरे, डॉ. राम बजगिरे, प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, कार्यकर्ते आदींनी पुढाकार घेऊन योगाचे धडे घेतले. संयुक्त राष्ट्रसंघाने २०१५ पासून २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. कार्यक्रमाचा उद्देश सर्वसामान्यांमध्ये योगाची जागरूकता वाढवणे व निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे हा होता. योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. यंदाच्या योग दिनाची थीम म्हणजे योग फॉर सेल्फ ॲण्ड सोसायटी (स्वतःसाठी आणि समाजासाठी योग) यावेळी शहरातील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल, प्रतिभा निकेतन विद्यालय, विविध संघटनांचे पदाधिकारी, योग प्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५


## इकरा पब्लिक शाळेत योग दिवस साजरा



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल मोहाडी येथे सर्वांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक व इतर कर्मचारी आंतरराष्ट्रीय योग दिवसाला उपस्थित होते. सकाळी शाळेच्या प्रांगणात शाळेचे सर्व विद्यार्थी उपस्थित झाले व श्री आमीर खान यांनी सर्वांना योगाभ्यास शिकवला.शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी देखील आनंदाने शिकवलेले योग पूर्ण केले.श्रीमती जिया मॅडम यांनी जमलेल्या सर्वांना योगाचे महत्त्व पटवून दिले व सतत योगा करण्यास प्रोत्साहन दिले.माननीय मुख्याध्यापक श्री.एस.एस शेख सर यांनी जीवनात योगा चे महत्त्व पटवून दिले. शाळेतील शिक्षक श्री साजीद खान सर यांनी सर्वांचे आभार मानले. अशाप्रकारे इकरा पब्लिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा झाला.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


## तरुणांनी योग्य अभ्यास सराव आत्मसात करावा - प्रभारी प्राचार्य डॉक्टर संजय अस्वले






**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आधुनिक काळात बदलत्या तंत्रज्ञानाबरोबरच पर्यावरण आणि आपली जीवनशैली बदलत चालली आहे. त्यामुळे मानवी आजाराचे स्वरूपही बदलत आहे. संसर्गजन्य रोगावर विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मात केली आहे. परंतु रासायनिक खतांचा वापर त्याचबरोबर पर्यावरणाची हानी यामुळे मधुमेह आणि उच्च रक्तदाब या आजाराला सामोरे जाण्यासाठी योगा प्राणायाम आणि ध्यानधारणा ची गरज आहे. म्हणून तरुणांना सक्षम बनण्यासाठी योगा अभ्यासाचा सराव नियमित करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन योग दिनाच्या समारोपप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉक्टर संजय अस्वले यांनी केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय योग सेंटर, एनसीसी, एनएसएस विभागाच्या वतीने योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे योगशिक्षक डॉ जी एन सोमोशी सोमवंशी यांनी योगा प्राणायाम आणि ध्यानधारणा नियमित कशी करावी यासाठी प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन दिले.२१ जून हा दिवस दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो.भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. तो प्रस्ताव १७७ देशांच्या पाठिंब्याने मंजूर झाला २१ जून हा वर्षातील सर्वात मोठा दिवस दीर्घ दिवस असतो. हा दिवस योगशास्त्रातही खूप महत्त्वाचा मानला जातो. म्हणून दरवर्षी २१ जूनला योग दिन साजरा केला जातो महाविद्यालयात आयोजित या योग दिनानिमित उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी, डॉ डी व्ही माने, डॉ पी एस माने, डॉ विनोद देवरकर, डॉ अशोक पदमपल्ले प्रा विजय पवार, डॉ राजू सूर्यवंशी, प्रा सुजित शिंदे, उमरगा पोलीस उपनिरीक्षक रामहरी चाटे पोलीस कॉन्स्टेबलसंगमेश्वर नाकाडे तसेच प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, एनसीसी विद्यार्थी करिअर कट्ट्याचे पोलीस अकॅडमी चे प्रशिक्षक तानाजी लेंडवे आणि विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## न्यू हायस्कूल व महात्मा फुले प्राथमिक शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा




**कन्नड (स्वप्नील राठोड) :** न्यू हायस्कूल व महात्मा फुले प्राथमिक शाळा, कन्नड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत प्रेरणादायी आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी 7.30 वाजता शांततेच्या आणि अनुशासित वातावरणात झाली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. विनोद पाटील सर आणि श्री. येवतीवाड सर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी विविध योगासने, प्राणायाम, अनुलोम-विलोम यांचे प्रात्यक्षिक सादर केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागृती आणि सकारात्मकता निर्माण झाली.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अत्यंत समर्पण आणि शिस्तबद्धतेने विविध योगासने सादर केली. 'योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी असून, निरोगी जीवनासाठी अत्यावश्यक आहे' हा संदेश विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे रुजवण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ शारीरिक नव्हे तर मानसिक आरोग्याचे महत्त्वही पटले. योग दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून, आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रारंभ आहे, नियमित योगाभ्यासामुळे विद्यार्थी अधिक एकाग्र, मनोबलवान व सशक्त बनतात,असा विश्वास शिक्षकवर्गाने व्यक्त केला."योगा केल्याने मन एकाग्र, शरीर निरोगी आणि जीवन सुंदर बनते – शाळेतील विद्यार्थ्यांनी अनुभवले योगाचे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५


## दौलताबाद येथे लर्निंग लायसन्स वाटप शिबिर घेण्यात आले



**दौलताबाद (शिवाजी गायकवाड) :** येथे माजी उपसरपंच तथा जिल्हा उपाध्यक्ष भरष्ट्राचार विरोधी समिती सय्यद शेरू यांच्या वतीने लर्निंग लायसन्स वाटप शिबिर भरष्ट्राचार विरोधी समिती तर्फे आयोजित करण्यात आले दौलताबाद परिसरातील युवकांसाठी दरवर्षी सय्यद शेरू यांच्या वतीने लर्निंग लायसन वाटप करण्यात येते यावेळी १५० युवकांना लायसन्स वाटप काँग्रेस पश्चिम अध्यक्ष सर्जेराव चव्हाण, भ्रष्टाचार विरोधी समिती अध्यक्ष सय्यद साबेर, माजी उपसरपंच सय्यद शेरू, पोलीस उपनिरीक्षक बापू डोमाळे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे आयोजन सैय्यद शेरू यांनी केलेयावेळी राष्ट्रवादी अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष सय्यद लायकोदिन,मा. सरपंच सय्यद हारून कागझीपुरा सरपंच साजिद कुरेशी विजय जाधव वनिता एकनाथ मुळे दीपक घुसले पवन गायकवाड शेख अतिक सैय्यद राझिक किशोर जाधव ग्रामविकास अधिकारी अख्तर पटेल साबेर खान, शेख एजाज, कल्याण कंजूने, साबेरा शेख बबली बाजी जम्मू टेलर शेख नूर रफीक कुरेशी दिलीप साठे शेख राईस शेख अशपाक शेख अलाओद्दीन करण पटेल सैय्यद तारिक आर्दीची उपस्थिती होती

## कार ची दुचाकीला धडक एक जण जखमी





**दौलताबाद (जावेद अहमद) :** नाशिक महामार्गावर, पाईप कंपनी जवळ माळीवाडा जवळ डीलक्स दुचाकी क्र MH२० FL६४७२ वर विलास कचरू पवार वय 58 राहणार शेवंता तालुका कन्नड जिल्हा छत्रपती संभाजी नगर हे जात असताना त्यांना सेन्ट्रो कार क्र MH४३ X ८७०३ ने धडक दिल्याने विलास जखमी झाले त्यांना जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज रुग्णवाहिका ने घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्ताना छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालय मध्ये दाखल केले आहे

## डॉ. सौ. इंदिराबाई पाठक महाविद्यालयात योग दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ सौ . इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात आज दिनांक २१-६ -२५ शनिवारी आरोग्य व योग हा कार्यक्रम आरोग्यवर्धिनी व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला .प्रमुख वक्त्या प्राध्यापक सुशीला बन्सवाल यांनी मेंदू ,पाठ ,पोट यांच्या आरोग्य विषयी तसेच वात , पित्त 'कफ या त्रिदोषांचे निर्मूलनासाठी सूक्ष्म व अत्यंत महत्त्वपूर्णमाहिती दिली माहिती दिली व योगासने करवून घेतली .तसेच योगासने फक्त एक दिवसा पुरते न करता त्यात सातत्य ठेवावे याचा आग्रह धरला .या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ सुनिता बाजपाई कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका माधुरी भावसार मॅडम आरोग्यवर्धिनी समिती प्रमुख डॉ रमा दुधमांडे मॅडम राष्ट्रीय सेवा योजना समिती प्रमुख डॉ अन्विता अग्रवाल मॅडम डॉ मनिषा वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ मीनल श्रीगिरिवार यांनी केले कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी , प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती .


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903



इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५


## योग दिनानिमित्त पर्यटकांना किल्ला मध्ये आज मोफत प्रवेश देण्यात आले



**दौलताबाद (जावेद अहमद) :** सध्या शाळेच्या सुट्या व संपली शनिवारी पर्यटकांची मोठी गर्दी दिसून आले किल्ला पाहण्यासाठी देश विदेशातील शेकडो पर्यटक किल्ला पाहण्यासाठी येत असतात सुट्टीत पर्यटकांच्या गर्दीने किल्ला बहरले आहे वेरूळ लेणी, घुरुष्णेश्वर मंदिर ,भद्रा मारुती मंदिर,जरजरी दर्गा खुलताबाद येथे भाविक व पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते त्याच बरोबर दौलताबाद किल्ल्यावर सुद्धा पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देतातपर्यटकांच्या गर्दी ने बहरल्याने व्यवसायीकाना सुगीचे दिवस दिसत आहे |हॉटेल चालक, फळ विक्रेते, फोटोग्राफर, गाइड, पुस्तक विक्रेते, कटलेरी विक्रेते, आईसगोळा विक्रेते यांचे व्यवसाय बरे दिसत आहेवाहन पार्किंग सुद्धा फुल्ल झाल्याचे दीसून आले. दौलताबाद किल्ला, खुलताबाद, सुलीभजन,वेरूळ लेणी, घुरुष्णेश्वर मंदिर, म्हैसमाळ आदी ठिकाणे एकाच रस्त्यावर असल्याने पर्यटक मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी येत असतात

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक योगदिन संपन्न






**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात जागतिक योगदिनानिमित्त योग आचार्य डॉ. भागवत योगी यांनी सप्रयोग, प्रात्यक्षिक योगासह मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ. एस.पी.खिल्लारे हे होते , यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही के. खिल्लारे, उपप्राचार्य,उपप्राचार्य प्रा. एन. एम करडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. भागवत योगी यांनी योग साधनेला आपल्या जीवन शैलीचा भाग बनवले तरच आपले व्यक्तिगत, कौटुंबिक तसेच सामाजिक व राष्ट्रीय स्वास्थ्य उत्तम राहील असे स्पष्ट केले. त्यांनी दैनंदिन जीवनात सहज सोपे करावयाची आसने व त्यांचे आरोग्यदायक परिणाम याविषयी माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले, यावेळी डॉ. आर .व्ही. मस्के, डॉ. बी.एन शिंदे, डॉ. व्ही. जी .पिंगळे, कॅप्टन अनिता वेंकेश्वर, कॅप्टन अशोक बारगजे, डॉ. एस. पी. बुधवंत, कार्यालयीन अधीक्षक श्री. राजू पट्टेकर, श्री. संतोष कुंडेटकर यांची प्रमुख उपस्थिती होती, सदर कार्यकमाचे सूत्रसंचालन प्रा. नवनाथ गोरे यांनी तर आभार डॉ. व्ही .जी. पिंगळे यांनी व्यक्त केले .

## दोन दुचाकी अपघातात तीन जण जखमी

**दौलताबाद (जावेद अहमद) :** सायंकाळी सात वाजता धुळे - सोलापूर हायवे महामार्गावर फतियाबाद येथे अपघात झाला आहे, (1) दिनेश दिलीप पगारे, (2) योगेश सोमनाथ बल्हाळ, रा.किनगाव, ता.फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर, (3) संघर्ष संतोष कीर्तिशाही, रा. कांचणवाडी, ता. जि.छत्रपती संभाजीनगर.हे जखमी झाले त्यांनाजगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थांनची रुग्णवाहिका ने घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्ताना छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालय मध्ये दाखल केले, अपघातग्रस्त गाडी नं:- MH.२०.FM.९४३७ व MH.२०.FQ.१८६४

## अज्ञात वाहनाच्या धडकेने पायी चालणारा व्यक्ती जखमी

**दौलताबाद (जावेद अहमद) :** नाशिक हायवे महामार्गावर देवतकर टायर एजन्सी समोर, माळीवाडा येथे अज्ञात वाहनाच्या धडकेने पायी चालणारा व्यक्ती जखमी होऊन रोडच्या कडेला पडलेला होता त्याला, लगेच जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थांनची रुग्णवाहिका घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्ताना छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालय मध्ये दाखल केले, अपघातग्रस्त पेशंटचे नाव 1) राजू गंगाराम झाले, रा.मंगरूळ, ता,जि.लातूर असे आहे.

## जागतिक योग दिनानिमित्त प्राथमिक आरोग्य उपकेंद्र अब्दी मंडी, दौलताबाद येथे योग साजरा




**दौलताबाद (जावेद अहमद) :** स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज आसेगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा.*स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज आसेगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी शाळेचे संचालक श्री रत्नाकर फाळके गीता फाळके व प्राचार्य योगेश फाळके यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी योग दिनाच्या निमित्ताने शाळेमध्ये योगासने करून निरोगी जीवनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. योगशिक्षक श्री योगेश सर यांनी योगासनाचे प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना करून दाखवली व विद्यार्थ्यांनीही त्यांना प्रतिसाद देत योगासनांची विविध आसणे केली. यामध्ये भुजंगासन ,पद्मासन ,ताडासन, कपाल भारती, व्याघ्रासन, शवासन यासारख्या योगासनांचा समावेश होता. यानिमित्त शिक्षक व विद्यार्थी यांनी नित्य योगासने करण्याचा संकल्प केला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थी जीवनात योगासनाचे असणारे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५

# विद्यार्थ्यांना दैवत मानून गुणवत्तेसाठी कटिबद्ध असणारे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे






आतापर्यंत अनेक प्राचार्यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून आपली ओळख निर्माण करून दिली आहे. साधारणपणे समाजात प्राचार्य शब्दाची विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी मंडळींना फार भीती व तितकाच आदरही असतो. प्राचार्य हे पद प्रतिष्ठेसह अत्यंत जबाबदारीचे आणि जोखमीचे ही तेवढेच आहे. विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी,संस्थेचे अध्यक्ष,सदस्य, विद्यापीठ प्रशासन आणि शासन या सर्वांशी ताळमेळ घालणारा व्यक्ती म्हणजेच प्राचार्य असतो. कॉलेज, व्हिलेज आणि नॉलेज या सर्वांची सांगड घालून विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना उत्तरोत्तर पुढे नेणारा व्यक्ती म्हणजेच प्राचार्य होय. या पदावर कार्यरत असणारी व्यक्ती जर सर्वगुणसंपन्न असेल तर निश्चितच महाविद्यालयाचे नावलौकिक होते. ग्रामीण भागातला विद्यार्थी शिक्षणापासून वंचित न राहता त्या विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन आपले भविष्य आणि आयुष्य उज्वल करावे असे प्रत्येक शिक्षकांना आणि प्राचार्यांना वाटते . आतापर्यंत अनेक प्राचार्यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून आपली ओळख करून दिलेली आहे. त्यापैकीच ग्रामीण भागातील शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगरचे विद्यमान प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे सर हे आहेत. संत एकनाथांची भूमी असलेल्या पैठण व परिसरात मात्र शैक्षणिक बाबतीत मागासलेपण म्हणावे लागेल. गोरगरीब,अनाथ, अपंग, निराधार, एकटे, परके, शोषित, पीडित या लोकांपर्यंत शिक्षणाची गंगा जाऊन त्यांच आयुष्य आणि भविष्य उज्वल व्हावं अशी तळमळ मनाशी बाळगून प्राचार्य डॉ. कोठावळे सर अहोरात्र मेहनत करतात. फेब्रुवारी 2022 मध्ये शिवछत्रपती महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी डॉ.चंद्रसेन कोठावळे सर यांची नियुक्ती झाली. आणि इथूनच ठिणगी पडली महाविद्यालयाच्या विकासाच्या कायापालटाची. प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे सर या पदावर रुजू झाल्याने महाविद्यालयाच्या पाचोड पैठण परिसरात मरगळ आलेली शैक्षणिक चळवळ गतिमान झाली असेच म्हणता येईल. सरांनी महाविद्यालय आणि आजूबाजूच्या परिसराचा आधी नीट निरखून अभ्यास केला. शिवछत्रपती महाविद्यालयाला येण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाने स्थापित केलेले मॉडेल डिग्री कॉलेज घनसावंगी या ठिकाणी त्यांच्याकडे प्राचार्य पदाचा कार्यभार होता. त्यांच्या कार्यकाळात सरांनी अनेक उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, व्यसनमुक्त कॉलेजचा परिसर, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी विविध उपक्रम, कॉलेजच्या परिसरामध्ये वृक्षारोपण, गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मदत असे एक ना अनेक उपक्रम सरांनी राबवले. तत्पूर्वी मत्स्योदरी शिक्षण संस्था अंबड या ठिकाणी ते वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासत त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण कामेही केली. त्यामध्ये त्यांनी ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, स्त्री-पुरुष समानता, जलसंवर्धन कार्य, स्त्री साक्षरता, सामाजिक साक्षरता, असे एक ना अनेक विविध उपक्रम त्यांनी राबवून विद्यार्थी आणि पालकांमध्ये समन्वय साधण्याचं अत्यंत महत्त्वपूर्ण काम त्यांनी केलं. त्याची दखल घेऊन मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एड. अंकुशराव टोपे यांनी शैक्षणिक वर्ष १९९६ मध्ये मत्स्योदरी सेवा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. माझा देश आहे आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत त्याचप्रमाणे हे महाविद्यालय माझं आहे आणि महाविद्यालयांमध्ये शिकणारे विद्यार्थी माझेच आहेत ही जाणीव ठेवून विद्यार्थी आणि शिक्षकांना सोबत घेऊन अत्यंत कमी वेळेतच शिवछत्रपती महाविद्यालय जिल्ह्यापुरतं, तालुक्यापुरतं,गावा पुरतं मर्यादित न ठेवता शिवछत्रपती महाविद्यालय मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात नावलौकिक कसा होईल याकडे त्यांनी लक्ष दिलं. माय माखल्या नजरेने बघणारे आणि तुपात भिजलेल्या शब्दांनी बोलणारे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे अशी उपमा दिली तर वावगे ठरणार नाही. शिवछत्रपती महाविद्यालय फक्त पाचोड किंवा छत्रपती संभाजीनगर एवढ्या पुरतं मर्यादित न राहता महाविद्यालयाने महाराष्ट्रात ग्रामीण महाविद्यालय म्हणून नावलौकिक मिळवला आहे. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन स्पर्धा २०२१-२२ मध्ये आदर्श महाविद्यालय आणि उत्कृष्ट प्राचार्य म्हणून राज्य स्तरीय द्वितीय पारितोषिक, 2022- 23 मध्ये शिवछत्रपती महाविद्यालयाला राज्यस्तरीय तृतीय पारितोषिक तर विभागीय प्रथम जिल्हास्तरीय, आणि प्रथम महाविद्यालय उत्कृष्ट समन्वयक प्रथम महाविद्यालय, तर उत्कृष्ट समन्वयक द्वितीय असे एकूण पाच पुरस्कार तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे सरांना राज्यस्तरीय उत्कृष्ट प्राचार्य द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. हे सर्व पुरस्कार म्हणजे पाचोडकरांचा सन्मानच आहे. मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष शिक्षण महर्षी ॲड.अंकुशरावजी टोपे साहेब यांच्या सानिध्यात आणि शिस्तीत सरांची जडणघडण झाल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक वेगळेपण दिसून येते. आज सरांना शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये तीन वर्षे पूर्ण होत आहेत. नुकताच प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने सन २०२५ चा मानाचा मराठवाडा भूषण पुरस्कार संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय सिरसाट, दिल्ली येथील राष्ट्रीय पत्रकार अशोक वानखेडे, पत्रकार संघाचे राज्य अध्यक्ष संजय भोकरे, एबीपी माझाच्या निवेदिका सरिता कौशिक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्या निमित्ताने प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी महाविद्यालयातील मागील तीन वर्षातील केलेल्या कामाचा घेतलेला हा आढावा ; 01. महाविद्यालय परिसराचे सुशोभीकरण.२. महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण.03. महाविद्यालयाला नॅकचा B+ दर्जा प्राप्त.४. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा उपक्रमांतर्गत उल्लेखनीय कार्य.५. शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय. अर्थशास्त्र परिषदेचे यशस्वी आयोजन. ६. करिअर कट्टा उपक्रमांतर्गत महाविद्यालयाला राज्यस्तरीय आदर्श महाविद्यालय म्हणून दोन वेळा (२०२१-२२ आणि २०२२-२३) पुरस्कार.७. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी डिजिटल सेवा उपलब्ध.८. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना ऑनलाईन न्यूज पेपर वाचण्याचे सुविधा उपलब्ध.९. शैक्षणिक वर्ष २०२४ २५ मध्ये वित्तीय साक्षरता या विषयावर ऑनलाइन राष्ट्रीय परिषदेचे आयोजन.१०. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी कटिबद्ध. ११. महाविद्यालयाच्या इमारतीसाठी आणि इतर सोयी सुविधा साठी पीएम उषा योजनेअंतर्गत पाच कोटी रुपये अनुदान निधी प्राप्त.12. प्राध्यापक आणि कर्मचारी यांच्या शैक्षणिक विकासासाठी विविध उपक्रम.13. नुकताच लोकमत वृत्तपत्र समूहातर्फे लोकमत ग्लोबल एज्युकेशनल एक्सलन्स अवार्ड २०२४ हा पुरस्कार अझरबैजान देशाच्या बाकु या पर्यटन राजधानी शहरांमध्ये दिनांक 05 डिसेंबर 2025 रोजी प्राप्त झाला.१४. ग्लोबल मॅनेजमेंट कौन्सिल, अहमदाबाद या संस्थेकडून सन २०२३ मधील राष्ट्रीय आदर्श प्राचार्य पुरस्कार प्राप्त. १५. मनुष्यबळ लोक विकास अकॅडमी, मुंबई या संस्थेकडून राज्य स्तरावरील आणि राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट प्राचार्य पारितोषिक २०२३ प्राप्त. १६. पुरोगामी सामाजिक आणि सांस्कृतिक महासंघ, पार्वती प्रतिष्ठान तथा सामाजिक जनकल्याण संस्था, संभाजीनगर यांच्या वतीने स्नेहलता मारुतीराव पाटील जिवन गौरव पुरस्कार २०२५ प्राप्त. १७. श्री शिवाजी विद्या प्रसारक मंडळ, धुळे आणि रिअल इंडो ग्लोबल व्हीजन सोशल डेव्हलपमेंट गुरुकुल फाऊंडेशन, धुळे या संस्थेकडून समाजरत्न पुरस्कार २०२५ प्राप्त. शिवछत्रपती महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा वाढावा म्हणून काहीआगामी योजना.1 महाविद्यालयाचे विद्यार्थी एमपीएससी तसेच यूपीएससी च्या स्पर्धा परीक्षा च्या माध्यमातून वर्ग 1 व 2 श्रेणीचे अधिकारी व्हावेत करिता विशेष प्रयत्न.2. तसेच महाविद्यालयाचे विद्यार्थी नव उद्योजक बनावेत म्हणून विशेष मार्गदर्शनाची सोय. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून अहोरात्र काम करणारे प्राचार्य डॉ.चंद्रसेनजी कोठावळे सर यांच्या कार्य आणि कर्तुत्वाला सलाम...सरांच्या नेतृत्वाखाली, या ज्ञानमंदिराने विकासाची नवनवीन शिखरे पादांक्रात केली,जणू काही ज्ञानाचा सूर्य उगवला! आपल्या तीन वर्षाच्या यशस्वी कारकीर्दीत, महाविद्यालयाने प्रगतीचा वेगळाच आलेख मांडला. प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे सर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी अथक परिश्रम घेतात, जसे की एखादा कुशल शिल्पकार दगडाला सुंदर आकार देतो आणि त्यातून एक आकर्षक मूर्ती घडवतो, त्याचप्रमाणे सर आपल्या मार्गदर्शनाने विद्यार्थी रुपी सुंदर शिल्प घडवण्याचा प्रयत्न करत आहेत, जे त्यांच्या जीवनाला एक योग्य आणि तेजस्वी दिशा देईल. तसेच सरांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी ज्ञानाचे मोती वेचले. त्यातून सामाजिक बांधिलकीची भावना त्यांच्यात रुजवली गेली. सरांनी महाविद्यालयात अनेक नवनवीन उपक्रम राबवले,जसे की एखादा माळी आपल्या बागेत नवनवीन फुले फुलवतो. शैक्षणिक,सामाजिक,आणि सांस्कृतिक उपक्रमांची बाग आपण इथे फुलवली. 'नॅक मूल्यांकनात 'बी प्लस' ग्रेड मिळवला.' जणू शिरपेचात मानाचा तुरा रोवला. पीएम उषा अंतर्गत शैक्षणिक निधी मिळवला. त्याचा महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी नक्कीच फायदा होईल. सरांनी आर्थिक शिस्त जपली. विद्यार्थ्यांसाठी करिअर कट्टा सुरू केला, जणू त्यांच्या भविष्याचा मार्ग खुला केला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योग जागरूकता निर्माण केली. तुम्ही विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना जगाच्या स्पर्धेसाठी तयार करतात याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आपण विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला,जसे एखादा संगीतकार आपल्या वाद्यातून सुरेल संगीत निर्माण करतो. त्याप्रमाणे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून सुरेल संगीताचे जणू उधळणच झाली. आपण एक आदर्श प्राचार्य आहात, जसे दीपस्तंभ जहाजांना मार्गदर्शन करतो.आपण एक प्रेरणादायी,हसतमुख, उत्साही, कार्य मग्न व्यक्ती आहात. आपण कुटुंबाचा आणि महाविद्यालयाचा आधारवड आहात. आपल्या कार्याचा आलेख उत्तरोत्तर वाढत जावो आणि आपल्याला उत्तम निरोगी आरोग्य लाभो हीच सदिच्छा आणि शुभेच्छा... आदरणीय प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठाळे सरांना शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड या ठिकाणी आपल्या सेवेचे 03 वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने घेतलेला हा आढावा.. समाजातील शिक्षकांनी आदरणीय प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे सरांचा आदर्श घेऊन आपलं जीवन दैदीप्यमान करावं हाच या पाठीमागचा संदेश आहे...

**शब्दाकांन - श्री. योगेश गुंजकर**
(संस्थापक अध्यक्ष- शोन्या कंन्ट्रक्शन, घनसावंगी)